वा विशेष

# सारा टॉवर्सचा विस्तार आता औरंगाबाद बाहेरही

बांधकाम व गृहनिर्माण व्यवसायात अत्यंत विश्वासपात्र नाव म्हणून ख्याती पावलेल्या सारा टॉवर्स प्रा. लि. ने आता औरंगाबादबाहेरही विस्ताराला सुरूवात केली आहे. या संस्थेचा १०० घरांचा गृहप्रकल्प तुळजापुरात आकाराला येत असताना उस्मानाबाद, फुलंब्री, कन्नड, बिडकीन येथे नवे प्रकल्प उभारण्याची प्राथमिक तयारी सुरू केली आहे. औरंगाबाद शहरात सध्या या संस्थेचे १४ गृहप्रकल्पांचे काम सुरू आहे, अशी माहिती संस्थापक, संचालक सीतारामजी अग्रवाल यांनी दिली.



आपण काम करीत राहावे, फळाची अपेक्षा करू नये, ते मिळतेच. कुणाला लवकर, कुणाला उशिरा हे आपल्या आजीचे वचन प्रमाण मानणारे सीताराम अग्रवाल यांची व्यावसायिक वाटचाल जितकी यशस्वी तितकीच खडतर व सातत्यपूर्ण परिश्रमाची आहे. सोनाला (जि. बुलडाणा) येथील रहिवासी असलेले सिव्हील इंजिनिअरींग पूर्ण केल्यानंतर आठ-दहा महिने अप्पर पैनगंगा प्रकल्पात नोकरीही केली. त्याच काळात औरंगाबादेत अजंता फार्मा लि.चे काम सुरू झाले या कंपनीचे मालक व माझे मामा पुरुषोत्तम अग्रवाल यांनी या कामावर देखरेखीसाठी बोलावून घेतल्याने औरंगाबादेत आलो. त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर कळमनुरीनजिक अप्पर पैनगंगा प्रकल्पात छोटी-मोठी कामे मिळवून गुत्तेदारी प्रकल्पात १९८० साली छायादेवींशी विवाह झाल्यानंतर औरंगाबादेत स्थायिक झालो. सिडको कार्यालयाचे प्रवेशद्वार व कुंपणाची भिंत बांधण्याचे काम मिळवून व्यवसायाला प्रारंभ केला. १९८३ पर्यंत सिडकोची अनेक कामे केली. संभाजीराजे विद्यालय, बळीराम पाटील विद्यालय, गोदावरी पब्लिक स्कूल या शाळांच्या इमारती बांधल्या. १९८४ साली नाशिक सिडकोच्या चौथ्या गृहनिर्माण योजनेचे मोठे काम मिळाले. ते सुरू असताना १९८६ साली सिडकोच्या एका अधिकाऱ्याच्या आडमुठपणामुळे अक्षरश: व्यवसाय उद्‌ध्वस्त होण्याची वेळ आली होती. मला संपवण्याचा जणू या अधिकाऱ्याने चंगच बांधला होता. त्यामुळे १९८६ ते १९९४ पर्यंत अत्यंत खडतर काळ गेला. जवळच्या जुन्या ट्रक्समधून बिल्डिंग मटेरियल सप्लायर्सचा धंदा अगदी रस्त्यावर उभे राहून करावा लागला. पत्नीने त्या काळात घरी ब्लिचींड सोप बनवणे व फिरून विकण्याचे काम करून पडत्या काळात साथ दिली. धीर खचलेला नव्हता म्हणून प्रतिकुलतेवर मात करीत पुन्हा १९९४ पासून छोट्या कामांपासून गुत्तेदारीला सुरुवात केली. १९८६ ते १९९५ पर्यंतच्या काळात काढलेले कर्ज १९९८ पर्यंत पूर्ण चुकते केले. त्यानंतर दोन वर्षे अजंता फार्मा लि. च्या रशियातील प्रकल्पाची देखरेख करण्याची संधी मिळाली ती निष्ठेने पूर्ण केली. तेथून परतल्यानंतर स्वतंत्र बिल्डरशिप सुरु केली आणि प्रगतीचा चढता आलेख सुदैवाने वाढत राहिला. देवगिरी बँकेचे अर्थसहाय्य आणि अजंता फार्मा लि.चे दोन भूखंड विकसित करण्याच्या कामापासून ही सुरूवात झाली होती. त्यानंतर शहरात पाच मोठे गृहप्रकल्प उभे केले. सर्व घरांची विक्री झाली. गुणवत्ता, दर्जा, पारदर्शकता, प्रामाणिक व्यवहार या जोरावर ही प्रगती झाली. प्रतिकूल प्ररिस्थितीतही सारासारविवेक आणि धैर्याने अनुकुलता साधता येते हा माझा जीवनानुभव आहे, असेही त्यांनी सांगितले. व्यावसायिकतेसोबतच लॉयन्स क्लब ऑफ औरंगाबाद आणि खडकेश्वर मंदिर ट्रस्टचे सदस्य म्हणून आपली सामाजिक कृतीशीलता जपणारे सीताराम अग्रवाल सारा टॉवर्सची वेगळी ओळख जपून आहेत.